| MHLA160002862020 | **नियमित फौजदारी खटला क्र.४७/२०२०**<br>**शासन वि. दत्तू व ईतर** |
|---|---|

–:: **नि.क्र.४१ लगत आदेश** ::–

अभियोग पक्षाकरिता विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.बी. भरडे यांनी व बचाव पक्षाचे अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार यांनी जोरदार युक्तिवाद केला. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. अभियोग पक्षाने भा.द.दि. चे कलम ४५२ च्या बाबत अतिरीक्त दोषारोपपत्र नोंदविण्याची विनंती केलेली आहे. सदर कलमा अंतर्गत असणाऱ्या गुन्ह्यामध्ये फिर्यादीच्या ताब्यातील घर किंवा जागा यामध्ये दुखापत, हल्ला किंवा अटकाव करण्यासाठी पुर्वतयारी करून अनधिकृतपणे प्रवेश करणे हा महत्त्वाचा भाग आहे. परंतु, अभियोग प्रकरणामध्ये घटनास्थळाबाबत एकाच वेळी दोन विसंगत बाबी नमूद आहेत. त्यामुळे घटनास्थळ म्हणजे नमूद बोळ वजा रस्ता हा सर्वस्वी फिर्यादी किंवा साक्षीदार यांचे असल्याचे म्हणता येणार नाही. यथास्थितीत, घटना पुर्णपणे अंगणामध्ये घडली याबाबत प्रथमदर्शनी स्थापीत होत नाही. सदर कलमाअंतर्गत गुन्ह्याचे संपूर्ण घटक प्रथमदर्शनी स्थापीत झाले नाहीत. सबब अर्जामध्ये तथ्य आढळून आले नाही. अर्ज नामंजूर करण्यात आला.

०२. आदेश संगणकावर टंकलिखीत केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.07.04 17:44:58 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ०४–०७–२०२५**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**